सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टे शन समोर, येरवडा पुणे
दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-adobcpune@gmail.com

---

जा.क्र.ससं/इमाबक/भासशि/विजाभज-इमाव-विमाप्र/महाडीबीटी/मार्गदर्शन/२०२४-२५/१३२२ दि.२६/०७/२०२४

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित / कायम विनाअनुदानित
व्यावसायिक महाविद्यालये (सर्व),
पुणे जिल्हा.

**विषय :** शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करिता "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" अंतर्गत अर्ज सादर करणेबाबतची माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करणेबाबत

**संदर्भ :** १. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.१३.१२.२०२३
२.इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.११.०३.२०२४
३. मा.अवर सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडिल पत्र क्र.वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५ दि.२५.०७.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता **"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना"** राबविण्यास संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत अर्ज करणेकरिता योजनेबाबतची माहिती दर्शनी भागावर प्रसिध्द करावी. संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये सदर योजनेअंतर्गत अर्ज करताना दिलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत -

**अ) मुलभूत पात्रता :-**

१. विद्यार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा.
२. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
३. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाचा जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.
४. अनाथ प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिका-याचे अनाथ प्रमाणपत्र आनिवार्य आहे.
५. दिव्यांग प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
६. विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न **रु.२.५० लाख** पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी

मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

७. विद्यार्थ्याने स्वतःचा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील.

८. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा.

**ब) शैक्षणिक निकष :-**

१. सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

२. व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांस सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान ६० टक्के किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन / CGPAचे गुण असणे आवश्यक राहील.

३. व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार त्या संबंधित प्रवर्गातून प्रवेश देण्यात येतील.यासाठी इयत्ता १२ वी च्या गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल.

४. निवडलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यत लाभास पात्र राहील.

५. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात / संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.

६. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

७. योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्याची महाविद्यालयीन उपस्थिती किमान ७५% असावी.

८. निवड करण्यात आलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

संदर्भिय शासन पत्र क्र. ३ अन्वये सदर योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मधील अभ्यासक्रमाच्या व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्याकरिता अंतिम मुदत वाढवून दिलेली असून सदर मुदत दि.३१.०७.२०२४ पर्यंत राहिल. तथापि अभ्यासक्रमातील प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरिता सदर योजनेंतर्गत अर्ज स्वीकृती दि.०५.०८.२०२४ पासून सुरू करण्यात येणार असून सदरच्या विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.२०.०८.२०२४ राहिल याची नोंद घ्यावी.

**सोबत**- अर्जाचा नमुना व अर्जासोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी

(विशाल लोंढे)
सहाय्यक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण पुणे

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर:-**

१.मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा पुणे

२. मा.प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, पुणे.